**फौ.कि.अ. क्र. ४४२/२०२६**

**सहा. अधिक्षक दिवाणी विभाग,**

**जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद.**

**वि. धर्मराज राठोड.**

**<u>भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २२३ अन्वये फिर्यादीच्या</u>**

**<u>साक्षीदाराची तपासणी</u>**

**नाव :** योगेश मनोहर जामखेडकर,

**वय :** ४९वर्ष, **धंदा :** नोकरी,

**राहणार :** दिवाणी न्यायालया, व. स्तर, औरंगाबाद.

**देवाची शपथ खरे सांगतो की,**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १३५६/२०२५ मध्ये वारसाहक्क प्रमाणपत्र मिळण्याकरीता सामनेवाला यांनी अर्ज दाखल केला होता. सदरील अर्जामध्ये सात कायदेशिर वारसदार आहे अशा कथनांचे शपथपत्र सामनेवाला याने दि. ०९.०९.२०२५ रोजी दाखल केले होते. त्यामध्ये चार कायदेशिर वारस सामनेवाला यांनी लपवले आहे असे न्यायालयाच्या निदर्शनास आले. त्यानंतर दि. ०७.०१.२०२६ रोजी पुन्हा दुसरे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले. सदरील प्रतिज्ञापत्राची तपासणी करत असतांना मा. न्यायालयाच्या असे निदर्शनास आले की, सामनेवाला याच्याकडुन अजुन तीन वारसाबद्दलची माहिती लपवलेली आहे. त्यामुळे न्यायालयाने सामनेवाला याच्याविरुध्द फौजदारी तक्रार बी.एन.एस. कलम २२९(A), २३६ व २३७ प्रमाणे नोंदवण्याचे निर्देश मला देण्यात आले.

०२. तसेच, सामनेवाला यांनी न्यायालयामध्ये खोटा पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल करुन न्यायालयाची दिशाभुल केलेली असुन सामनेवाला याच्याविरुध्द कठोर कार्यवाही करण्यात यावी.

साक्षीदाराची सही समक्ष

**(पी.आर.पालवे)**

दिः १३/०५/२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१२,

**औरंगाबाद.**